*Power of Knowledge Peer Review Journal, Volume : III, Issue :III Oct. to Dec. 2019 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286*

# लोकराजा -शिवछत्रपती

**डॉ. फुलचंद सुर्यभान दुधभाते,**
इतिहास विभाग,
जवाहर महाविद्यालय, अणदूर, ता.तुळजापूर ,जि.उस्मानाबाद

**प्रस्तावना :-** भारताच्या इतिहास सात शिवाजी महाराजांचे वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. अतिशय बिकट परिस्थितीत शिवाजी महाराजाने आपल्या डोळयासमोर हिंदवी स्वराज स्थापण्याचे ध्येय ठेवले होते. ते सत्यात उतरवून दाखविले. शिवपूर्व काळात हिंदूमध्ये एकीचा अभाव होता. मराठयामध्ये आपापसात मतभेद होते . सर्व समाज जाती भेदानी पोखरला गेला होता. अंतर्गत वादामुळे समाजात हेवेदावे मोठया प्रमाणात निर्माण झाले होते. आपापसात भांडणा-या जहागिरदारामध्ये एकी निर्माण करण्याचे काम शिवाजी महाराजानी केले. हिंदूवर मुसलमान शासकाचे अत्याचार वाढले होते. या अत्याचारापासून आपली सुटका होईल असे वाटत नव्हते. अशा समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे काम शिवाजी महाराजांनी केले. च मुसलमानाचे अत्याचार मोठया प्रमाणात वाढले असताना शिवाजी महाराजांनी पीडीत जनतेला स्वाभिमान शिकविला. भयभीत झालेल्या जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

**उद्दिष्टये :** - लोक राजा म्हणून शिवाजी महाराजांच्या कार्याचा अभ्यास करणेचशिवकालीन समाज पूर्वपरंपरेने चालत आलेल्या धार्मिक रूढी, परंपरा आधारलेल्या जातीसंस्थेवर आधारीत होता. शिवकालीन समाजाच्या सर्व थरातील लोक जाती व्यवस्थेवर आधारलेली समाज रचना प्रमाण मानणारे होते. सतराव्या शतकातील महाराष्ट्रीय समाजात वैचारिक जागृतीचा अभाव होता. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजासमोर समाजात जाती भेद, पंथभेद असताना जुलमी मुसलमान सत्ताधिशाविरूध्द सर्व जाती जमातीच्या ठिकाण एका समान राजकीय ध्येयाची जाणीव निर्माण करून स्वराज्य स्थाना, सर्व धर्म रक्षण म्हणजे राजांचे राजधर्माचे कर्तव्य, म्हणून आणि सांस्कृतिक दहशतवाद संपुष्टात आणणे तसेच तत्कालीन कल्पनेनुसार स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करणे हा शिवाजी राजांचा ध्येयवाद होता. शिवाजी रजांनी स्वराज्याच्या हितामध्ये जाती, पंथ, श्रेष्ठ -कनिष्ठ इ.भेदभाव आड येऊ दिले नाहीत.

शिवाजी महारांजाचा कालखंड १६३० ते १६८० हा होता. महाराजानी अफझलखानापासून ते दिलेरखानापर्यंतच्या सेनानीचे अक्रमण परतावून लावले. महाराजानी लोककल्याणासाठी कारभार केला. प्रजाहितदक्ष राजा म्हणून लौकीक पसरला, शिवाजी महाराजानी सुरूवातीपासूनच आपल्या राज्यव्यवस्थेस मानवी समतेच्या पायावर उभे केले होते. स्वराज्यप्रेम, कार्यक्षमता आणि चारित्र्यसंपन्नता या गुणांचा विकास आपल्या मावळयात निर्माण करून स्वराज्याची उभारणी केली. वर्णभेद, जात, धर्म, पंथभेद याला छेद देवून आपल्या कार्यक्षम व शिस्तबद्ध सैनिकाच्या जोरावर भारतातल्या शाह्याना धुळ चारली.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

महाराजानी स्वराज्याच्या सेवेत मराठा, प्रभू, भंडारी, ब्राम्हण, मुसलमान, हटकर, कुणबी, कोळी, वंजारी, न्हावी, आदी लोकांना सामावून घेतले. सर्वसाधारण माणसामधूनच निष्ठावान व कार्यक्षम माणसे घडविली. सैनिकाना रोख पगार दिली. स्वराज्यातील तरूणांना अर्थपूर्ण रोजगार पुरवून महाराजांनी त्यांचे जीवनमान सुधारले. महाराजांची राज्यवस्था ही लोककल्याणासाठी होती.

इथल्या लोकांचे शोषण करणा-या संस्थाचे महाराजानी उच्चाटन केले. जहागिरी प्रथा बंद केली. प्रशासनामध्ये जे अधिकारी नेमले ते रोख वेतनावर , त्यांच्यामध्ये राज्याबद्दल निष्ठा निर्माण केली. राज्यामध्ये रयतेवर अन्याय, अत्याचार होऊ नये याकडे महाराजांचे खास लक्ष होते. रयतेचा वाटा रयतेला मिळावा आणि शासनाचा वाटा शासनाला मिळावा. असा महाराजांचा दंडक होता. मुघलकाळात शेतसारा हा जास्त प्रमाणात वसूल केला जात असे. परंतू महाराजांनी जमिनीची मोजणी करून त्या जमिनीची प्रतवारी ठरवली त्यावरून शेतसारा ठरविला जाई. महाराजांनी शेतक-याला स्वतःच्या मुलाप्रमाणे वागवणूक दिली आहे. दुष्काळ, महापूर, रोगराही, नैसर्गिक अपत्ती अशा वेळी शेतसारा माफ केला. तसेच शेतक-यांना बैलजोडी खरेदी करण्यासाठी, विहिर खोदण्यासाठी, शेतीचे अवजारे खरेदी करण्यासाठी अर्थिक मदत देत असे. याचबरोबर शेतक-यांना पीककर्ज पण दिले जाई.

गावोगावी लष्करी प्रशिक्षणाची सोय ही केली होती. महाराजांनी न्यायव्यवस्था अतिशय चोख ठेवली होती. राज्यामध्ये सर्वांना नियम व कायदे सारखेच होते. भ्रष्ट अधिका-यांना महाराजांनी अतिशय कठोर शिक्षा दिल्या.

बेलवडीच्या सावित्रीबाई देसाई या महिलेचा विनयभंग केलेल्या सखोजी गायकवाड या सैन्यातील अधिका-यांचे डोळे काढण्याचे आदेश महाराजानी दिले होते. आज वर्तमानपत्रात दररोज विनयभंगाच्या बातम्या येतात, आणि आरोपी पुराव्याअभावी सुटतो पुरंदरच्या किल्याच्या बांधकामात एका ब्राम्हण अधिका-यांने भ्रष्टाचार केला होता. महाराजानी त्याला ती रक्कम सरकारात जमा करण्यास भाग पाडले. आजचे राज्यकर्तेच भ्रष्टाचारी आहेत. मग अधिकारी भ्रष्टाचार का करणार नाहीत. आदर्श सोसायटी -च्घोटाळा. याचे उत्तम उदाहरण सांगता येईल.

स्वराज्याच्या राजकारभारात महाराजानी वंशपंरपरेपेक्षा गुणवत्ता आणि पात्रतेला अधिक महत्व दिले. स्वराज्य आणि स्वधर्म या ध्येयवादासाठी वाटेल ती किंमत मोजण्याची त्यांची तयारी होती. कोणत्याही संकटाला तोंड देण्याचे सामर्थ्य त्यांच्या जवळ होते. चातूर्य, धाडसीवृत्ती , अलौकीक राजनिती कौशल्य, सार्वजनिक हिताची जाण, सूक्ष्म निरीक्षण शक्ती, माणसाची पारख, स्वतःच्या धर्माबद्दल अधिमान त्याच बरोबर परधर्म सहिष्णूवृत्ती , सर्वधर्मातील साधुसंताबद्दल आदर, स्त्रियाबद्दल आदर, गरीबाबदलची कणव, विधेची अभिरूची, अन्यायाचा प्रतिकार करणारा, असे अनेक गुण महाराजांच्या ठायी एकवटलेले होते.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

महाराजांच्या गुणांची, पराक्रमाची आणि शौर्याची आणि स्त्रियाबद्दलची आदरयुक्त भावना याबद्दल खुद्द त्यांच्या शत्रुने तारीफ केलेली दिसून येते.

**समारोप : -** शिवाजी महाराजांनी ज्या काळात मुघल सतेशी लढा देण्यास सुरूवात केली. त्यावेळेस मोगल साम्राज्याचा चांगलाच विस्तार झालेला होता. एका जहागिरदाराच्या मुलाने अशा बलाढय शक्तिशी सामना करणे ही कल्पनाच मान्य होत नाही.चआपल्या हिंदू बांधवासाठी दक्षिणेतील मुसलमान शाहया आणि उत्तरेतील मुघली सत्ता यांना आव्हान करावयाचे होते. परंतू शिवाजीचे राजनितीचे ज्ञान, राजकारणाची पध्दती, कमालीचे प्रासंगीक धाडस, उत्कृष्ट राजकारणी, शत्रू मित्राची पारख इ. गुणामुळे मुघल सत्तेला पराभूत करणे शक्य झाले आहे.

**संदर्भ :-**

१) छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र - केळुसकर
२) श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकीत्सक चरित्र - बा.सी-बेंद्रे
३) शिवचरित्र एक अभ्यास - संतू माधव पगडी
४) शिवाजी आणि शिवयुग - सदाशिव आठवले
५) मराठयांचा उदय आणि उत्कर्ष - प्र.न. देशपांडे
६) श्री छत्रपती शिवाजी महाराज - व्हि.एस.बेंद्रे
७) शिवचरित्र एक एक अभ्यास - सेंतू माधवराव पगडी
८) House of Shivaji - J.N.Sarkar
९) Shivaji and his Times - J.N.Sarkar

◆◆◆



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad